MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

maharashtraaarambh@gmail.com

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक – दिपक थोरात



जुनी पेन्शन योजना सुरु करण्यात यावी अशी मागणी करत संघटनेला पाठींबा देत आज नगर परिषद कर्मचाऱ्यानी काळ्या फिती बांधून निषेध केला.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –८५ | गुरूवार दि.१४ डिसेंबर २०२३ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -85 | THURSDAY DT.14 DECEMBER 2023 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## आरोग्य कर्मचारी बेमुदत संपावर बीड जिल्ह्यातील

# आरोग्य सेवा कोलमडली

**बीड / प्रतिनिधी**

**आज महाराष्ट्रामध्ये जवळपास ४७ हजार नर्सेस बेमुदत संपामध्ये दाखल आहेत यामध्ये आज आरोग्य सेवा बीड जिल्ह्यातील कोण म्हणले आहे तर बीड जिल्हा रुग्णालयामध्ये पेशंटचे हाल होत आहेत तरी महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये आरोग्य यंत्रणेवर परिणाम झालेला आहे यामध्ये गोरगरीब जनतेच्या आरोग्य सेवा महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री आरोग्य मंत्री यांनी दखल घेऊन तात्काळ आरोग्य कर्मचारी सिस्टर ब्रदर सह आरोग्य कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य करून त्यांना सुद्धा न्याय द्यावा अशी मागणी जनतेतून होत आहे**

कारण वर्षाचे ३६५ दिवस असले तरी आरोग्य सेवा ही योग्य पद्धतीने बीड जिल्हा रुग्णालय महाराष्ट्रामध्ये देण्यामध्ये सर्वात सिंहाचा वाटा यामध्ये महाराष्ट्रातील आरोग्य सेवक करत आहेत त्यामुळे आरोग्य सेवकांना न्याय मिळावा व त्यांच्या मागणी मान्य होत अशी मागणी जनतेच्या वतीने आज करण्यात येत आहे याचाच भाग म्हणून बीडमध्ये सुद्धा आंदोलन जोरात झालेले आहे यामध्ये जिल्हा जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हाधिकारी यांनी संबंधितांना निवेदन पाठविले आहे की यामध्ये आरोग्य सेवकांना सुद्धा न्याय मिळावा व त्यांच्या मागण्या शंभर टक्के मान्य झाल्या पाहिजेत अशी सर्वपक्षीय संघटना व कर्मचारी अधिकारी संघटनेच्या वतीने मागण्या मान्य झाल्या पाहिजेत सरकार-निमसरकारी, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी समन्वय समिती महाराष्ट्र, राज्य ने घेतलेल्या निर्णया नुसार मागण्यांच्या आग्रहासाठी...... १४ डिसेंबर २०२३ पासून बेमुदत संपावर जाणार–रितसर नोटीस...

माहे मार्च २०२३ मध्ये सरकारी कर्मचारी, शिक्षक यांनी जिव्हाळ्याच्या प्रलंबित मागण्यांसाठी बेमुदत संप आंदोलन छेडले होते. तत्समयी आपण सदर संपात मध्यस्थी करुन संघटना प्रतिनिधींशी चर्चा केली. सदर चर्चेत आमची प्राधान्यक्रमावर असलेली 'जुनी पेन्शन सर्वांना मंजूर करा' या मागणीबाबत लेखी हमी देऊन आम्हाला दिलासा दिला होता. इतर १७ मागण्यांबाबत सत्वर निर्णय घेतले जातील असेही निसंदिग्ध आश्वासन




आपण दिले होते. त्या मुळे शासन स्तरावरील कार्यवाही पूर्ण होण्यास वेळ मिळावा या उद्देशाने आपल्या विनंती नुसार आम्ही संप आदोलन संस्थगित केले.

राज्याच्या प्रमुखांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता होईल अशी आम्हास अपेक्षा होती. परंतु गत सहा महिन्यांचा कालावधी उलटून गेल्यावरही कोणत्याही मागणी संदर्भात अंतीम ठोस निर्णय अद्याप होऊ शकला नाही. त्यामुळे सर्वदूर महाराष्ट्रातील कर्मचारी शिक्षक कमालीचे संतप्त झाले आहेत. हा रोष व्यक्त करण्यासाठी राज्यातील १७ लाख कर्मचारी–शिक्षकांनी दि. १४ डिसेंबर २०२३ पासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्धार पक्का केला आहे.

राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री उपरोक्त घोषित संप आदोलनाबाबत आपुलकीने विचार करून संभाव्य संघर्ष, सर्व प्रलंबित मागण्यांबाबत कर्मचारीभिमुख ठोस निर्णय घेऊन टाळला जाईल, अशी अपेक्षा आहे. वि. बहित प्रलंबित मागण्यांबाबत ठोस निर्णय तत्काळ होऊ शकले नाहीत तर मात्र निर्णयाक संर्घष चकारी कलुष आहार महातुल सहायक कृपया समजून घ्यावे व चर्चेच्या माध्यमातून वोस निर्णय सत्वर घ्यावेत.राज्य सरकारी निमसरकारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी मध्यवर्ती समन्वये समिती, सरकारी – निमसरकारी, शिक्षक–शिक्षकेतर, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत कर्मचारी समन्वय समिती, महाराष्ट्र मागणी पत्रक – २०२३ राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेला विशेष बाब म्हणून मान्यता दिली जाईल हे शासनाने दिलेले आश्वासन गृहित धरुन मागण्यांची सनद सादर करण्यात येत आहे

# 'मागेल त्याला शेततळे' योजना अधिक व्यापक करणार – धनंजय मुंडे

## कृषी व रोजगार हमी या दोन्ही विभागाच्या समन्वयातून अधिकाधिक शेतकऱ्यांना मिळेल लाभ

### प्रश्नोत्तराच्या तासात धनंजय मुंडेंची माहिती

नागपूर – 'मागेल त्याला शेततळे' ही कृषी विभागाची अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना असून, अवर्षणग्रस्त भागातील शेतकऱ्यांना याचा अधिक लाभ मिळावा, यादृष्टीने विदर्भ, मराठवाड्यासह कोकणात देखील या योजनेला अधिक व्यापक स्वरूप देण्यात येणार असल्याची माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात



### कोकणातील शेततळ्यांसाठी दरफरक दूर करण्यासाठी व्यापक बैठक घेऊन निर्णय घेणार

बोलताना दिली.

'मागेल त्याला शेततळे' योजनेतील प्रलंबित व रद्द झालेल्या अर्जाबाबत लातूर ग्रामीणचे आमदार धीरज देशमुख यांनी प्रश्न उपस्थित केला असता धनंजय मुंडे यांनी याबाबतची सविस्तर आकडेवारी विधानसभा सभागृहात

(उर्वरीत पान २ वर)



बीड : नागपूर येथे हिवाळी अधिवेशनात विधानभवनात कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्यासमवेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर उपस्थित होते. यावेळी त्यांनी विविध प्रश्नांचे निवेदन दिले.

# सीएस बडेंच्या नेतृत्वाखाली जिल्ह्याची आरोग्यसेवा सुपरफास्ट

## सर्वच एमएसचा घेतला आठ तास आढावा; दर्जेदार रुग्णसेवेसाठी तत्पर राहण्याचे दिले कानमंत्र

बीड :– जिल्ह्यातील संपूर्ण शासकीय आरोग्यसेवेमध्ये वेळेत आणि दर्जेदार रुग्णसेवा मिळवून देण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक बडेंनी यंत्रणा तरतरित करत जिल्ह्यातील संपूर्ण एमएसची बैठक बोलावून सहा तास आढावा घेतला. यावेळी प्रत्येक रुग्णांना आपल्यास्तरावरच आरोग्यसेवा मिळवून देण्यासाठी प्रयत्नशिल राहण्याचेही सांगितल्याने सीएस बडेंच्या नेतृत्वाखाली जिल्ह्याची आरोग्यसेवा सुपरफास्ट झाली आहे.

रुग्णालयात आलेला रुग्णांला वेळेत आणि दर्जेदार आरोग्यसेवा मिळाली तर रुग्ण समाधान राहू शकतो. यासाठी डाक्टारांबरोबच कर्मचार्यांनाही तन–मनाने काम करावे लागले. ज्या त्या ठिकाणीच अनेक सोयी सुविधा दिल्या तर सिव्हीलवरील येणार अतिरिक्त भार कमी होवू शकतो. तसेच रुग्णालयात येणार्या रुग्णांना उपचारसेवेत कमतरता करू नये त्याचबरोबर सर्व अधिकारी कर्मचार्यांनी आपल्या कर्तव्यावर वेळेत यावे आणि आपले कर्तव्य पार पाडावे. तसेच कुणी कामचुकारपणा करत असले तर त्यास एकदा समस देवून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावे. रुग्णालयातील स्वच्छतेबाबतही सुचना करण्यात आल्या यावेळी अनेक



### प्रत्येक महिन्याला घेणार आढावा

प्रत्येक वैद्यकीय अधीक्षकांना आप आपल्या सेंटर मध्ये रुग्णसेवेबरोबर शस्त्रक्रियाचेही प्रमाण वाढण्याचे सांगितले केले असून यापुढे ज्या त्या ठिकाणीच अनेक आजारावरिल शस्त्रक्रिया होणार असून दर महिन्याला प्रत्येक उप जिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयांचा आढावा घेतला जाणार असल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक बडेंनी म्हटले आहे.

वैद्यकीय अधिकार्यांकडून काही मुद्दे उपस्थित करण्यात आले. त्यावर सीए बडेंकडून तोडगा काढत आरोग्यसेवेसाठी कायम दक्ष राहून काम करत असल्याचे दाखवून दिले. विविध कामाच्या पद्धतीबरोबर त्यांना दिलेल्या कानमंत्रामुळे जिल्हाची आरोग्यसेवा तरतरित होवून रुग्णसेवा सुपरफास्ट होणार असल्याचे दिसून येते. जिल्हाशल्यचिकित्स डॉ.अशोक बडे यांनी घेतलेल्या आढावा बैठकीला बाह्यरुग्ण वैद्यकीय अधिकारी डॉ.लक्ष्मीकांत तांदळे, डॉ.हनुमंत पारखे, नेकनूर स्त्री रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक डॉ.गित्ते, नेकनूर स्त्री रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक डॉ.हुबेकर, परळी वैद्यकीय अधीक्षक डॉ.गुट्टे, माजलगाव वैद्यकीय अधीक्षक डॉ.कट्टे, पाटोदा वैद्यकीय अधीक्षक डॉ.राऊत, धानोरा वैद्यकीय अधीक्षक डॉ.ढवळे, केज वैद्यकीय अधीक्षक डॉ.केंद्रे, तालखेड वैद्यकीय अधिकारी डॉ.पंडीत, गेवराई वैद्यकीय अधीक्षक डॉ.नोमानी, आष्टी वैद्यकीय अधीक्षक डॉ.टेकाळे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

### रेफरवर लागणार ब्रेक

अनेक रुग्णालयात उपचार होत असतांनाही काही वैद्यकीय अधीकार्यांकडून कामचुकारपणा करत सर्रासपणे रुग्ण रेफर केले जात असल्याच्या अनेक तक्रारी आल्याने जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक बडेंनी आढावा घेवून कामावर नियंत्रण ठेवण्याचे आदेश दिले. त्याचबरोबर विनाकारण एकही रुग्ण रेफर झाला नाही पाहिजे याचेही तंबी देण्यात आली. यामुळे ज्या त्या ठिकाणीच उत्तम आणि दर्जेदार रुग्णसेवा मिळाणार आहे.




# रब्बी पिकांवर कीडरोगाचा वाढला प्रादुर्भाव

**शिरूर कासार। प्रतिनिधी**

तालुक्यात आठवड्यात हवामान बदल झाल्याने रब्बीतील पिकांना कीडरोगाचा प्रादुर्भाव झाल्याने त्यावर प्रतिबंधात्मक उपायाकरिता शेतकरी कृषी केंद्रात जाऊन महागडे कीटकनाशक खरेदी करत असले तरी त्याचा कीडरोगावर प्रभाव पडत नसल्याने शेतकरीवर्ग मेटाकुटीस आला आहे. या गंभीर प्रकाराकडे कृषी विभागाकडून दखल घेतली जात नासल्याने पिके धोक्यात आले आहेत.

(उर्वरीत पान २ वर)

### कृषी विभागाचे दुर्लक्ष

तालुक्यातील शेतकरीवर्गांना कृषी विभागाकडून योग्य मार्गदर्शनकरिता शेतीशाळा घेऊन प्रत्येक पिकांवरचे कीडरोग प्रादुर्भावासंदर्भात माहिती प्रत्येक गावात जाऊन देणे गरजेचे असताना त्याकडे कृषी विभागाचे दुर्लक्ष होत आहे, तर कृषी केंद्रचालकांकडून शेतकरीवर्गांची लूट होत आहे.




# बीडकरांनो खाजगी बँकांपासून सावध व्हा दाखवायची बँक मांडायचा 'बाजार'

बीड : जिजाऊ मल्टीस्टेट, साईराम अर्बन आणि ज्ञानराधा मल्टीस्टेट या बँकांमधील ठेवी अडकल्याने सर्वसामान्य माणूस मेटाकुटीला आलेला आहे. त्यामुळे आता बीडच्या कुठल्याच बँकेवर लोकांचा विश्वास दिसून येत नाही. त्यामुळे बीडकरांनो खाजगी बँकांपासून थोडं सावध रहा कारण या भुरट्यांचे आता काही खरे नाही अशी संतप्त प्रतिक्रिया स्वाभिमानचे जिल्हाध्यक्ष प्रा.सचिन उबाळे यांनी व्यक्त केली आहे. यावर आपण लवकरच आवाज उठविणार असून माहिती अधिकाराद्वारे सर्व सत्य जनतेसमोर आणणार असल्याचा इशारा उबाळे यांनी दिला आहे.

सुरूवातीच्या काळामध्ये चंपावती, हिना त्यानंतर जिजाऊ, ज्ञानराधा, साईराम, मातोश्री अशा अनेक बँका मोडकळीस आल्यानंतर सर्वसामान्य बीडकर मात्र आता घायकुतीला आला आहे. जिजाऊ बँकेचे बबन शिंदे आतापर्यंत फरार आहे. त्याला पोलिस प्रशासनाचेही अभय असल्याचे बोलले जात आहे. लोकांच्या अनंत अडचणी आहेत. कॅन्सरच्या ट्रिटमेंटला देखील या बँकेमधील बाजारबसव्यांनी पैसे दिले नाहीत. गरीबांचे लग्न राहिले, मुलांचे शिक्षण राहिले, अनेकांनी घर बांधण्यासाठी ठेवलेले पैसे या बँकेच्या स्वयंघोषित 'सहकारमहर्षींनी' आपल्या घषात घातले. संबंधीत बँकेच्या सर्वच सम्राटांनी लाजा सोडून लोकांच्या ठेवी

(उर्वरीत पान २ वर)

### संचालकांनाच दिले नियम बाह्य कर्ज !

काही जणांनी बँकेच्या नावाखाली 'बाजार' मांडला आहे. माहितीच्या अधिकारातून आपण ही बाब लवकरच उघड करणार असून अनेक बँकांनी आपल्या संचालकमंडळातील 'सावकारांना' सर्वसामान्यांच्या ठेवी नियम ढाब्यावर बसून वाटल्या आहेत. आपल्या बापाची मत्ता आहे म्हणून त्यांनी हा कारभार केला आहे का ? बँकेची वाहने स्वत:च्या स्वार्थासाठी वापरलेली आहेत. याचा उलगडाही आपण करणार असल्याचे प्रा.सचिन उबाळे यांनी पत्रकात म्हटले आहे.

### गरिबाचा वाली कोणी आहे का ?

एखाद्या गरीब कर्जदाराकडे कर्ज थकल्यानंतर प्रशासन मात्र अॅलर्ट मोडवर येते. झोपेतून उठण्याच्या अगोदरच वसुली पथक दारात असतं. प्रशासकीय यंत्रणा सुध्दा दरोडेखोर असल्या सारखी ट्रिटमेंट त्या कर्जदाराला देते. मग एखादी बँक जेव्हा सर्वांसमोर पैसे घेवून पळून जाते तेव्हा मात्र प्रशासन मुग गिळून गप्प असतं. अशा सहकारामधील चोरांना प्रशासनानेही तात्काळ जेरबंद केलं पाहिजे अशी मागणीही पत्रकाद्वारे प्रा.उबाळे यांनी केली आहे.

# लिंबागणेश येथे कृषी विभागा मार्फत शेतकरी शेतीशाळा सपन्न:- डॉ.गणेश ढवळे




लिंबागणेश:- बीड तालुक्यातील मौजे.लिंबागणेश येथे आज दि.१४ गुरुवार रोजी ग्रामपंचायत कार्यालयात कृषी विभाग यांच्या मार्फत पिकावरील किड रोग सर्वेक्षण व सल्ला (कापसप) सन २०२३-२४ अंतर्गत कृषी विषयावर शेतकरी शेतीशाळेचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी सरपंच बालासाहेब जाधव होते तर प्रमुख पाहुणे म्हणून कृषी विषयक तज्ञ प्रा.संतोष सानप

आदित्य कृषी महाविद्यालय बीड हरभरा पिकावरील मर आणि घाटेआळी रोगांवर नियंत्रण आणण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय व रोगनिवारणसाठी औषधी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.यावेळी मंडळ अधिकारी सतिश मिटकरी,कृषी पर्यवेक्षक संतोष काशिद, कृषी सहाय्यक आनंद वाघ,विक्रम हावळे,मुकेश भागडे,आत्माचे अशोक काळे यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रस्ताविक कृषी पर्यवेक्षक संतोष काशिद यांनी तर सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन डॉ.गणेश ढवळे यांनी केले.यावेळी उपसरपंच बाळकृष्ण थोरात,ग्रां.सदस्य श्रीहरी निर्मळ, समीर शेख, महादेव कुदळे , अशोक जाधव, माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे,रविबापु निर्मळ, भगवान मोरे, बाळासाहेब मुळे,दादा गायकवाड, पांडुरंग वाणी, संतोष भोसले आदि शेतकरी बांधव उपस्थित होते.

लिंबागणेश परीसरात गेल्या काही दिवसांत अवकाळी पावसाने हवामानात बदल झाल्याने ढगाळ वातावरण व धुके यामुळे रब्बी हंगामातील हरभरा पिकांवर पाने खाणाऱ्या हिरव्या घाटे अळीचा प्रादुर्भाव झाला असुन अनेक किटक नाशकांची फवारणी करुन सुद्धा अळीचा प्रादुर्भाव कमी होत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून त्यांना मार्गदर्शन करताना प्रा.संतोष सानप यांनी

इमामेक्टीन बेंझोएट ७.५ ग्रम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी तसेच प्रोफेनोपेस २० मिली प्रतिदहा लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.जणेकरून अळ्या नष्ट होतील.तसेच अळ्यांचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी प्रतिबधात्मक उपाययोजनेची माहिती दिली.

इमामेक्टीन बेंझोएट औषध कृषी कार्यालयात ५० टक्के अनुदानावर मिळणार:- मंडळ अधिकारी सतिश मिटकरी

हरभरा पिकावर घाटी अळीचा प्रादुर्भाव झाल्याने उत्पन्नावर परिणाम होणार आहे.शेतक-यांना औषध फवारणीसाठी दुहेरी आर्थिक भुर्दंड सहन करत पदरमोड करावी लागणार आहे.

इमामेक्टीन बेंझोएट ५० टक्के अनुदान तत्वावर कृषी कार्यालय मध्ये उपलब्ध असुन शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन मंडळ अधिकारी सतिश मिटकरी यांनी केले.

## वाळू माफियांविरोधात गेवराईच्या तहसील कार्यालयावर आसूड बडवित आंदोलन




गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यात गोदावरी पट्टयात बेसुमार वाळू उपसा होत आहे. मात्र वाळू माफियांवर कारवाई होत नाही. परिणामी कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडत आहे. अवैध वाळू उपसा थांबवून माफियावर कारवाई करा,

या मागणीसाठी बाळासाहेब मस्के यांनी तहसील कार्यालयावर मंगळवारी आसूड बडवित आंदोलन केले. गोदावरी पट्ट्यात अवैध वाळू उपसा होत असून याकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात आहे. वाळू चोरांनी अक्षरक्ष गोदावरी पात्राची चाळण केली आहे. प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नाही. त्यामुळे वाळू माफिया कुणालाही जुमानत नाहीत. अवजड वाहनामुळे रस्ते पूर्णत खराब होत आहेत. परिणामी अपघातांचे प्रमाण वाढले आहे.

अवैध वाळू उपसा करून शासकीय महसूल बुडविणाऱ्यांवर कारवाई करा, या मागणीसाठी बाळासाहेब मस्के यांनी पोतराजाचा पोहराव करत आसूड बडवित अनोखे आंदोलन केले. यावेळी मनसेचे कार्यकर्ते उपस्थित होते



बीड शहरातील गांधीनगर परिसरात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट.गांधीनगर परिसरातील जेष्ठ नागरिक महिला शाळेतील विद्यार्थी लाहाण मुलें यांच्या मध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.तरी समस्त गांधीनगर भागातील नागरिकांची आसी मागणी आहे. नगरपालिकेने तात्काळ गांधीनगर भागातील डॉग व्हॅनची व्यवस्था करण्यात येवी.आसी मागणी राम दादा वाघमारे यांनी केले आहे




# सरकारी कर्मचारी रस्त्यावर

## ठिकठिकाणी कामबंद आंदोलन, राज्यभरात नेमकं काय घडतंय?

**लातुर । प्रतिनिधी**

राज्यातील १७ लाख सरकारी कर्मचाऱ्यांनी पुन्हा एकदा संपाचं हत्यार उपसलं आहे. जुनी पेन्शन योजना लागू करा, अशी मागणी करत राज्यात ठिकठिकाणी कर्मचारी रस्त्यावर उतरले आहेत. काही ठिकाणी सरकारविरोधात घोषणाबाजी देखील करण्यात आली आहे.या आंदोलनाला शासकीय, निमशासकीय, शिक्षक, शिक्षकेतर समन्वय समिती महाराष्ट्र राज्य कर्मचाऱ्यांनी पाठिंबा दर्शवला आहे. याशिवाय आरोग्य सेवेतील कर्मचारी सुद्धा संपात सहभागी झाल्याने आरोग्य व्यवस्थेवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

पुण्यातील ससून रुग्णालयामधील परिचारिकांनी आजपासून बेमुदत संप पुकारला आहे. जुनी पेन्शन योजना लागू करावी, तसेच आरोग्य विभागातील रिक्त जागा तातडीने भराव्यात अशा मागण्या त्यांनी केल्या आहेत. जिल्हा आणि ग्रामीण भागातील सरकारी रुग्णालयातील परिचारिकांनी देखील या संपाला पाठिंबा दिला आहे.

कोल्हापुरात सरकारी कर्मचारी आक्रमक

जुनी पेन्शन योजना लागू करा, या मागणीसाठी सरकारी कर्मचारी आक्रमक झाले आहेत. मध्यरात्री पासून कोल्हापुरातील सीपीआर रुग्णालयातील आणि शासकीय मुद्रणालय मधील कर्मचारी संपावर गेले आहेत. यामुळे आरोग्य सेवेवर परिणाम होत आहे.

संभाजीनगरमध्येही सरकारी कर्मचाऱ्यांचा संप

छत्रपती संभाजीनगर शहरातील घाटी रुग्णालयातील सर्व शासकीय कर्मचाऱ्यांनी संपांचं हत्या उपसलं आहे. रुग्णालयाच्या परिसरात शासकीय कर्मचाऱ्यांकडून जोरदार निदर्शने देखील करण्यात आले. रुग्णसेवर जास्तीचा परिणाम होऊ नये म्हणून, विद्यार्थ्यांना कर्मचाऱ्यांच्या ठिकाणी सेवा देण्याबाबत प्रशासनाने सूचना दिल्या आहेत.

# बीडच्या अभिषेक दुधाळची इंटरनॅशनल अबॅकस स्पर्धेसाठी निवड



बीड (प्रतिनिधी)

येथील जाधव प्रोऍक्टिव्ह अबॅकस अँड कोचिंग क्लासेस मधील विद्यार्थी अभिषक दत्तात्रय दुधाळ या विद्यार्थ्याने दिनांक १२ डिसेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर शासकीय इंजीनियर महाविद्यालय येथे झालेल्या मराठवाडा विभागीय अबॅकस स्पर्धायात 'विशेष प्रावीण्य मिळवले असून स्पर्धेत तो तिसरा आला आहे,त्याची कोल्हापूर येथे होणाऱ्या इंटरनॅशनल अबॅकस स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे

या स्पर्धेत जालना,परभणी, हिंगोली,धाराशिव,बीड, लातूर, नांदेड,या सात जिल्ह्यातून विद्यार्थी सहभागी झाले होते,बीडच्या चि.अभिषेक दत्तात्रय दुधाळ या विद्यार्थ्यांची निवड पुढील राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेसाठी झालेली आहे,या स्पर्धेत लहान गटातून बालाजी गणेश दुधाळ याचाही सहभाग होता, पुढील स्पर्धा दिनांक २५ डिसेंबर २०२३ रोजी कोल्हापूर या ठिकाणी संपन्न होणार आहे.

जाधव अबॅकस अंड कोचिंग क्लासेसचे एकूण सोळा विद्यार्थ्यांची निवड राष्ट्रीय स्पर्धेसाठी झालेली आहे.माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे अंगरक्षक दत्तात्रय दुधाळ यांचा मुलगा अभिषक याच्या निवडीबद्दल माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी आणि प्रा राजू मचाले,डॉ अरुण भस्मे,कोचिंग क्लासेसचे जाधव सर, स्वीय सहायक गिरीश देशपांडे, अशोक जाधव,पत्रकार प्रशांत सुलाखे,बाबू बहिर,प्रकाश राठोड,बेग,परमेश्वर धारकर,आशिष काळे,अजय धाडे, पांडुरंग भस्मारे,पीएसआय राजू गुळभिले,व मित्र वर्गातून अभिनंदन व शुभेच्छा दिल्या जात आहे

# शहीद ज्ञानदेव टाकळकर यांचे होणार स्मारक !

## पाली ग्रामस्थ करणार आर्थिक मदत

बीड / प्रतिनिधी : तालुक्यातील पाली येथील भूमिपुत्र ज्ञानदेव सावळाराम टाकळकर यांना भारत पाकिस्तान युद्धामध्ये १९६५ साली वीरमरण प्राप्त झाले त्यांचे पाली येते स्मारक होणार असून ग्रामस्थ आर्थिक मदत करणार आहे.



पाली येथील भूमिपुत्र शहीद ज्ञानदेव सावळाराम टाकळकर हे १९६५ साली भारत पाकिस्तान युद्धात त्यांना वीरगती प्राप्त झाली. शहीद ज्ञानदेव टाकळकर यांचे गावात स्मारक व्हावे यासाठी ग्रामसभेमध्ये ठराव घेण्यात आला. त्यामध्ये आपल्या गावचे भूमिपुत्र शहीद ज्ञानदेव सावळाराम टाकळकर यांचे स्मारक बांधण्याचे सर्वानुमती ठरले आहे. गावकऱ्यांच्या वतीने हे स्मारक उभारण्यात येत आहे. या स्मारकासाठी ग्रामपंचायत जागा उपलब्ध करून देणार असून ग्रामस्थ या स्मारकासाठी आर्थिक मदत करणार असे आश्वासन दिलेले आहे. हे स्मारक २६ जानेवारी पर्यंत पूर्ण करायचे आहे. तरी गावकऱ्यांनी आर्थिक मदत करावी, असे आवाहन करण्यात आले. पावती बुक पण छापले असून ज्यांना कोणाला फोन पे आर्थिक मदत करायची असेल त्यांनी फोन पे नंबर ७५ ६७ ३४० ५४४ या क्रमांकावर करावी असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान पाली ग्रामस्थांचा हा स्तुत्य उपक्रम असून शहिदाच्या स्मृती जपल्या जाणार आहेत तर तरुणांना देश सेवेची प्रेरणा या स्मारकांमधून मिळेल असे मत यावेळी नागरिकांनी व्यक्त केले.

# भुजबळांना पुन्हा तुरुंगात जायचे नाही:म्हणून ते जिवाला धोका अन् छाती दुखण्याचे नाटक करत आहेत, मनोज जरांगे यांचा हल्लाबोल

**बीड । प्रतिनिधी**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी गुरुवारी पुन्हा एकदा ओबीसी नेते तथा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्यावर एकेरी शब्दांत निशाणा साधला आहे. छगन भुजबळ एकदा तुरुंगात जावून आलेत. त्यांना पुन्हा त्यात जायचे नाही, त्यामुळे त्यामुळे ते माझ्या जिवाला धोका आहे, माझी छाती दुखत आहे, असे खोटेनाटे सांगून वेळ मारू नेत आहेत, असे ते म्हणालेत.

राज्यात जातीयवादाची भूमिका आम्ही नव्हे तर छगन भुजबळ यांनी भाषा सुरू केली. जातीय तेढ निर्माण केले. ते मंत्रिपदाची सन्मानच राखत नाही. त्यांना त्यांच्यावर सुरू असणाऱ्या खटल्यांतून मुक्ती हवी आहे. देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचा डावा समजून घ्यावा. हा तुम्हाला मागे टाकून पुढे जाईल. त्याच्याशी आमचे कोणतेही देणेघेणे नाही. पण या विश्वासघातकी माणसाचे ऐकून तुम्ही मराठा समाजावर अन्याय करू नका. कारण, सरकारविरोधात आता गावपातळीवर तीव्र रोष निर्माण होत आहे, असे जरांगे सरकारला इशारा देत म्हणाले.



गरीब मराठ्यांना आरक्षण हवे

मराठा समाजाच्या काही ठराविक नेत्यांना आरक्षण नको असेल, ते आमची बाजू प्रखरपणे मांडत नसतील, तर त्यांनी आरक्षण घेऊ नये. त्यांच्यावर मराठा बांधवांची बारीक नजर आहे. त्यांनी आरक्षण घेऊ नये. पण गरीब मराठ्यांना आरक्षण हवे आहे. त्यामुळे सरकारने या मोठ्या मराठ्यांचे न ऐकता गरीबांना आरक्षण द्यावे, असे मनोज जरांगे म्हणाले.

फडणवीसांविरोधात रोष वाढत आहे

राज्य सरकार एकट्या छगन भुजबळ यांचे ऐकून मराठा तरुणांवर गुन्हे दाखल करत आहे. बीड जिल्ह्यातील सर्वच नेते आपल्या घरावरील हल्ल्यात मराठा आंदोलकांचा हात नसल्याचे सांगत आहे. त्यानंतरही तेथील ३ हजार तरुणांवर गुन्हे दाखल करण्यात आले. यामागे भुजबळ आहेत, हे फडणवीस यांच्या लक्षात आले पाहिजे. या घटनाक्रमामुळे फडणवीस यांच्याविरोधात रोष वाढत आहे, असे मनोज जरांगे म्हणाले.

मराठे आंदोलनातून प्रत्युत्तर देतील

राज्य सरकार छगन भुजबळ यांच्या दबावाखाली येत असल्याचा आरोपही मनोज जरांगे यांनी यावेळी केला. ते खोटेनाटे आरोप करून मराठ्यांवर अन्याय करत आहेत. सरकारने मराठ्यांवर अन्याय होऊ देवू नये. गावखेड्यात सरकारविरोधात रोष पसरत आहे. याला सर्वस्वी कारणीभूत भुजबळ आहेत.

पान १ वरून...

**'मागेल त्याला ..**

मांडली. शेततळे मंजूर करणे कृषी विभाग करत असला, तरी राबविण्याची जबाबदारी रोजगार हमी विभाग पार पाडतो, त्यामुळे दोन्ही विभागांचा समन्वय साधून प्रत्येक पात्र लाभार्थ्याला लाभ देण्यासाठी दोन्ही विभागांच्या समन्वयातून अधिक व्यापक स्वरूप दिले जाईल, असेही धनंजय मुंडे याप्रसंगी म्हणाले.

कोकण क्षेत्रात जमिनी व भौगोलिक परिस्थिती थोड्या-थोड्या अंतरावर बदलते, त्यामुळे शेततळ्यांना मिळणारा दर व त्यातील फरक दूर करून अधिक व्यापक व शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेतला जावा, असा प्रश्न आ.भास्कर जाधव व आ.आशिष शेलार यांनी उपस्थित केला असता, दरफरक दूर करण्यासाठी दोन्ही विभाग मिळून मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन समावेशक निर्णय कालबद्ध पद्धतीने घेतला जाईल, असेही धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले. यावेळी आ.बाळासाहेब थोरात, बबनराव लोणीकर, प्रकाशदादा सोळंके, नानभाऊ पटोले आदींनी देखील या प्रश्नाबाबत चर्चेत सहभाग घेतला.

**रब्बी पिकांवर...**

तालुक्यात खरिपातील पिकाला अल्प पर्जन्यमान झाल्याने उत्पन्नावर त्याचा परिणाम झाला होता. यंदा रब्बी हंगामातील पीक साथ देईल या आशेवर शेतकरी राजा आपल्या काळ्या आईची ओटी भरण्यासाठी महागडे बी-बियाणे, खते घेऊन अल्प ओलीवर ७ हजार ६०० हेक्टर क्षेत्रावर पेरणी केली. त्यामध्ये ५ हजार ९०० हेक्टर क्षेत्रात ज्वारी, १२६४ हेक्टर क्षेत्रात हरभरा, तर ३४८ हेक्टर क्षेत्रात गहू पिकांची पेरणी केली आहे.

पीक जोमाने वाढले जात असताना तालुक्यात गेल्या आठवड्यात ढगाळ वातावरण निर्माण झाल्याने रब्बी हंगामातील हरभरा पिकावर घाटेआळीचा प्रादुर्भाव झाला. ज्वारी पिकावर शेंडेअळी पडली आहे. तसेचखरीप हंगामातील ४ हजार ८०५ हेक्टर क्षेत्रात तूरपीक बहरात असून त्यावर शेंगा पोखरणाऱ्या अळीचा मोठ्या प्रमाणावर फैलाव झाला असल्याने त्यावर नियंत्रण करण्याकरिता शेतकरी शहरातील, ग्रामीण भागातील कृषी केंद्रात जाऊन कीटकनाशक फवारणी करत असले तरी त्यावर त्याचा प्रभाव पडत नसल्याने शेतकऱ्यांची पिके संकटात सापडली आहेत.

तालुक्यात कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी वर्ग बीड, पाथर्डी, शिरूर कासार शहरांत राहून आपल्या मुख्यालयातील गावाचा कारभार पाहत असल्याने शेतकरीवर्गांना त्यांची महिनामहिना भेट होत नाही. तर काही कर्मचारीवर्ग १० ते १५ वर्षांपासून तालुक्यातील कृषी मंडळ बदलून अनेक वर्षांपासून कार्यरत असल्याने ते ठराविक शेतकरीवर्गांना कृषी योजनाचा लाभ देऊन आपली सेवा पार पडून वंचित घटकातील शेतकरीवर्गाकडे दुर्लक्ष करतात. याकडे वरिष्ठांनी दखल घेऊन त्यावर कारवाई होणे गरजेचे असल्याचे शेतकरीवर्गांकडून मागणी होत आहे.

**बीडकरांनो खाजगी...**

लाटल्या आहेत. याच ठेवीच्या जोरावर अनेकांनी कारखाने उभारले, गाड्या घेतल्या, मुलांना, कुटुंबाला लक्झरीयज् लाईफ दिली परंतू त्यांना याचं भान राहिलं नाही. परदेशातही काही जणांनी प्रॉपर्टी केले असल्याचे आता बोलले जावू लागले आहे. स्वत:च्या बापाची मालमत्ता असल्यासारखे हे बँकेचे मालक वागत आहेत. आता वेळ आल्यानंतर बारीक तोंडाने व्हिडिओ टाकत आहेत. लुनावर फिरण्याची औकात नसणारे महागड्या गाड्याचे धनी बनले. आता विश्वास ठेवा, मी तुमचाच आहे अशा वल्गना करत आहेत. त्यामुळे बीडकरांनी आता अशा अनेक भुरट्या बँकवाल्यांपासून सावध राहणे गरजेचे आहे. विशेषत: रिटायर्डमेंट नागरिकांनी काळजी घेणे गरजेचे आहे. ग्रुपमध्ये एकत्र येवून तुम्हाला जादा व्याजदाराचे आमिष दाखवले जाते आणि तुम्हाला लुटले जाते. नंतर पश्चाताप करून काहीच उपयोग नाही. कोणीच तुमच्या ठेवी परत करण्यासाठी प्रयत्न करत नाहीत. सध्या तरी बीडमधील अनेक खाजगी बँका या खाजगी व्यापारासाठी चालू असल्याचे निदर्शनास येत आहेत. प्रॉपर बँकीग करण्याचे पुण्यकर्म त्यांच्या हातून दिसून येत नाही. त्यामुळे आज ना उद्या या बँका लयास जाणार असल्याच्याही चर्चा आहेत. जे इतर 'मोठ्या' (लोकांच्या जिवावर झालेल्या) बँकांचे झाले ते सुध्दा या बँकांचं होऊ शकतं. विषाची परिक्षा घेवू नका, असे आवाहनही प्रा.सचिन उबाळे यांनी केले आहे. बुडीत निघालेल्या सर्वच बँकांनी तात्काळ सर्वसामान्य ठेवीदारांचे पैसे द्यावेत नसता तिव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही प्रा.सचिन उबाळे यांनी दिला आहे.

दरम्यान आमचे नेते आमदार नितेशजी राणे साहेब यांची नागपुर येथे भेट घेऊन बीड मधील सहकाराची सर्व परिस्थितीची माहिती दिली असता या बाबद आपण नक्की दोषींवर कारवाई होईल आणि सर्व सामान्य ठेवीदारांना न्याय मिळेल या साठी प्रयत्न करू असे आश्वासन दिले.



परतूर /प्रतिनिधी


राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी च्या अल्पसंख्यांक विभागाचे प्रदेश कार्याध्यक्ष वसीम बुऱ्हाण यांच्याउपस्थितीत जालना येथे बैठक संपन्न झाली

दिनांक ११ डिसेंबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक सेलचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष वसीम बुऱ्हाण यांनी, नागपूरला जाताना जालना येथे भेट दिली, व कार्यकर्त्यांशी पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी चर्चा केली, तसेच आगामी काळात जालना येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे जालना जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांची बैठक घेण्याचे यावेळी प्रदेश कार्याध्यक्ष यांनी ठरवले, तसेच सर्वसामान्य लोकांपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार गटाची विचार मांडत पक्ष बळकट करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले..तसेच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार बद्दल लोकांमध्ये विरोधी पक्ष संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत, म्हणून अजित पवार यांची भूमिका सर्वसामान्य लोकांपर्यंत मांडण्याच्या सूचना यावेळी प्रदेश कार्याध्यक्ष यांनी केल्या,

# लहान मुलांचे बालपण हिरावून घेत आहेत मोबाईल फोन!

मुक्रमाबाद प्रतिनिधी

आता प्रत्येक घरात मोबाईल आला आहे व येतही आहे आणि पुढे पण येत राहील. जेव्हा मुलं रडायला लागतात किंवा घरात खोडासापणा करतात तेव्हा त्यांचे पालक त्यांना शांत करण्यासाठी त्यांच्या हातात मोबाईल देतात. इथूनच ते मोबाईल व्यसनाच्या आहारी जात आहेत. तसेच हा मोबाईल त्यांची क्रिएटिव्हिटी आणि मैदान खेळ हीरावून घेत आहे. हा मोबाईल फोन विविध आजारांचा कारणीभूत ठरत आहे. मुलं जन्मताच ह्या फोन सोबत त्यांचा सेल्फी घेतला जात आहे. मोबाईल फोनची रंगीत स्क्रीन तेव्हापासूनच नवजात मुलांचे लक्ष वेधून घेऊ लागते. यानंतर ते मुलं हळूहळू लहानपणी खेळ आणि मैदान पासून दूर होत जात आहे.मोबाईलच्या व्यसनामुळे मुले खेळ आणि मैदानापासून दूर होत चालले आहेतच व मुलं दिवसभर मोबाईलवर कार्टून आणि व्हिडिओ बघता आणि ते एकाच ठिकाणी बसून मोबाईल गेम मध्ये मग्न राहतात. क्रिकेट सारखे निव्वळ मैदानी खेळ आता ही मुले मोबाईलवर खेळू लागली आहेत त्यामुळे मुलांमध्ये शारीरिक हालचाली ही कमी झाल्या आहेत. त्यामुळे बालपणात लटपणा



चिडचिड आजाराकडे ते जात आहे. स्मार्टफोनच्या अतिवापरामुळे मुलांमध्ये अनेक आजार होत चालले आहेत. शिवाय मुलांची जिद्दशाही कमी होत चालली आहे. मोबाईलच्या सतत वापरामुळे मुलांमध्ये आळशीपन्ना वाढत आहे. ज्याचे दुर्गा मी परिणाम पुढे येतीलच त्यामुळे पालकांनी मुलांना मोबाईल पासून दूर ठेवून पारंपरिक खेळाकडे न्यावे अशातच आत्महत्या सारख्या घटनांमध्ये वाढ होत असल्याची माहिती व स्फोटकाचे हे प्रमुख कारण मानले जात आहे. स्पोटकाच्या वापरामुळे मुलांमध्ये लटपणा नैरश्य आणि डोळ्यांचे आजार तर वाढत आहेत.

# राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये विद्यार्थी आघाडीची भुमिका महत्वाची -डॉ.योगेश क्षीरसागर

## विद्यार्थ्यांचे संघटन मजबूत करावे-प्रशांत कदम बीडमध्ये जिल्हास्तरीय आढावा बैठकीसह मेळावा

बीड (प्रतिनिधी)

प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे काम गतीने सुरु आहे. विद्यार्थ्यांचे प्रश्न जाणून घेवून ते शासन दरबारी मांडतात. अनेक प्रश्न मार्गी लागत आहेत. पक्षात विद्यार्थी आघाडीची भुमिका महत्वाची राहिलेली आहे. या आघाडीतून काम करणारे अनेकजण घडले, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले. तसेच, विद्यार्थी आघाडी सक्षम असल्यास पक्ष देखील सक्षम बनत राहतो. संघटनशक्तीची ही पहिली पायरी असून बीड जिल्ह्यात विद्यार्थ्यांचे संघटन मजबूत करावे, असे आवाहन राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम यांनी केले.

बीड शहरात राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसची जिल्हास्तरीय आढावा बैठक आणि मेळावा बुधवारी (दि.१३) पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व्यासपीठावर डॉ.क्षीरसागर, श्री.कदम यांच्यासह ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष इंजि. अजिंक्य आनेराव, शहरचे जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, शारेक जकेरिया आदींची उपस्थिती होती.

डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, बीड जिल्ह्यात राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस सक्षमपणे



काम करेल. सातत्याने अभ्यास आणि नवीन तंत्रज्ञान अवगत करणे काळाची गरज आहे. सोशल मीडियाची विंग विद्यार्थ्यांमधून तयार करावी. प्रत्येक ठिकाणी शाखा निर्माण कराव्यात. नवनियुक्त पदाधिकार्यांनी जिल्ह्यातील विद्यार्थी प्रश्नांवर ग्राउंड लेवलला उतरून काम करावे. माझे व पक्षाचे पाठबळ त्यांच्या पाठीशी कायमच असणार आहे. विद्यार्थी सशक्त असेल तर देश, राज्य व जिल्हा देखील सशक्त होतो. पर्यायाने युवा पिढी सशक्त होते. दोघांनी सयुंक्तपणे काम करत विद्यार्थी आघाडीची जिल्ह्यात व बीड तालुक्यात चांगली बांधणी करावी, असे आवाहन केले. यावेळी प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री धनंजय मुंडे विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर काम करत आहोत. त्यांचे प्रश्न सरकार मार्गी लावत आहेत. आता नव्याने कार्यकारिणी जाहीर कराव्यात. राज्यात ६० लाख विद्यार्थी आहेत. पहिला मतदार हा राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या पुढाकारातून तयार व्हावा. यासाठी मतदार नाव नोंदणीसाठी लक्ष द्यावे. कार्यकर्त्यांनी पूर्ण ताकदीने काम करावे. तुमच्या प्रत्येक अडचणीत काम पडण्याचा माझा प्रयत्न राहिल, अशी ग्वाही श्री.कदम यांनी दिली. इंजि.अजिंक्य आनेराव यांनी प्रास्ताविक करून आभार मानले. सुत्रसंचलन राहुल गिरी यांनी केले. यावेळी विद्यार्थी, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जिल्हाध्यक्षपदी इंजि.अजिंक्य आनेराव, शुभम कातांगळे

राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी इंजि.अजिंक्य आनेराव व शहर जिल्हाध्यक्षपदी शुभम कातांगळे यांची नियुक्ती करण्यात आली. राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम यांच्या हस्ते आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रमुख उपस्थितीत नियुक्तीपत्र देऊन दोघांचा सत्कार करण्यात आला. दरम्यान, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसची संघटनशक्ती मजबूत करू. विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी सदैव उपलब्ध राहू, अशी ग्वाही नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष आनेराव, कातांगळे यांनी दिली आहे.

# भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी शेख जमादार यांची हॅट्रिक

गेवराई, (प्रतिनिधी)- दिवंगत नेते गोपीनाथराव मुंडे साहेबांचे एकनिष्ठ कार्यकर्ते म्हणून ओळखले जाणारे, भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष पदापासून आपला राजकीय प्रवास सुरू करणारे शेख जमादार यांची अल्पसंख्यांक मोर्चा महाराष्ट्र राज्याच्या प्रदेश उपाध्यक्षपदी हॅट्रिक झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.

भाजपाचे महाराष्ट्राचे नेतृत्व असलेले उपमुख्यमंत्री देवेंद फडणवीस, प्रदेशाध्यक्ष आ.चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी साहेब, केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, केंद्रीय मंत्री ना.डॉ.भागवत कराड भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सरचिटणीस लोकनेत्ये पंकजाताई यांच्या मार्गदर्शनाखाली अ.मो.चे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानीजी व प्रभारी संजयजी केनेकर यांनी अल्पसंख्याक मोर्चाची नूतन कार्यकारिणी घोषित केली. त्यात दिवंगत नेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचे कट्टर समर्थक म्हणून परिचित असलेले शेख एम.जमादार यांची अ.मो.च्या प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. बीड जिल्ह्याच्या दबंग खा.डॉ.प्रितमताई मुंडे, माजी विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ नाना बागडे, भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोदजी तावडे आ. लक्ष्मण आण्णा पवार यांच्या शिफारशीवरुन ही निवड करण्यात आली. विशेष म्हणजे भाजपा अल्पसं. मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी शेख जमादार यांची ही तिसऱ्यांदा झालेली निवड आहे

शेख जमादार हे गेल्या पंचवीस वर्षापासुन भारतीय जनता पार्टीमध्ये मुंडे परीवारासोबत इमाने-इतबारे राहुन पक्षाचा एकनिष्ठ चेहरा, शांत, संयमी, मितभाषी




वेळप्रसंगी आक्रमक व्यक्तीमत्व म्हणून ओळखले जाणारे सर्वसामान्य जनतेत वावरणारे,जात, पात, धर्म यापेक्षा सर्वसमावेशकपणे निस्वार्थ राजकारण व समाजकारण करणारे, गरीब व ग्रामीण जनतेचे नेतृत्व करणारे शेख एम.जमादार यांनी लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या आदेशाने राजस्थान विधानसभा २००८ च्या निवडणुकीमध्ये बिकानेर आणि नागोर दोन जिल्ह्याचे निवडणुकीचे प्रभारी पद सांभाळलेले आहे तसेच या पुर्वी दोनवेळा भाजपाचे गेवराई तालुकाध्यक्ष, जिल्हा उपाध्यक्ष, जिल्हा सरचिटणीस, १० वर्षे प्रदेश उपाध्यक्षा, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य आदी पदे भूषविली आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी त्यांच्याकडे प्रदेश उपाध्यक्षपदाची जवाबदारी तिसऱ्यांदा सोपवून पुन्हा नव्या उमेदीने पक्षवाढीसाठी सक्रीय केले आहे. या निवडीबद्दल शेख जमादार यांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आदी सर्स्तरातून अभिनंदन होत असून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.



शिवसेना (उ.बा.ठा. )शहर प्रमुख पदी शेख निजाम (भैय्या )यांची निवड झाल्याबद्दल शुभेच्छा देताना फहीम इनामदार, फेरोज पटेल, रियाज सिद्दीकी, पोलिस बॉईज असोसिएशन चे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष रविंद्र शिनगारे

# साऊथ आफ्रिकेत होणाऱ्या अंडर १९वर्ल्ड कपसाठी सचिन धसची निवड

प्रतिनिधी। बीड

बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचा फलंदाज सचिन धसची अंडर-१९ वर्ल्डकपसाठी भारतीय संघात निवड झाली आहे. यंदा अंडर-१९ वर्ल्डकप हा साऊथ आफ्रिकेत होणार आहे. त्याच्या निवडीबद्दल बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनने अभिनंदन केले आहे.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ अर्थात बीसीसीआयने अंडर-१९ वर्ल्ड कपसाठी १५ खेळाडूंच्या संघाची नुकतीच घोषणा केली. यामध्ये बीड जिल्ह्याचा सुपूत्र सचिन धस याची निवड झाली. दरम्यान, नुकतीच त्याची निवड आशिया करंडकसाठी अंडर-१९ भारतीय संघात झाली होती. त्या सामन्यात सचिनने केलेल्या चमकदार कामगिरीची दखल घेऊन आता वर्ल्ड कपसाठी संधी मिळाली आहे. त्याचे संघातील फलंदाजीचे स्थान देखील पूर्वीच्या तुलनेत अव्वलस्थानी असणार आहे. सचिनला क्रिडा प्रशिक्षक अजहर शेख यांचे मार्गदर्शन लाभले आहे. त्याच्या यशाबद्दल बीड जिल्हा क्रिकेट




असोसिएशच्यावतीने अध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर, कार्याध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, सचिव आमेर सलीम, महेश वाघमारे, राजन साळवी, इरफान कुरेशी, मनोज जोगदंड, जावेद पाशा, रिजवान खान, आमेर सिद्दीकी, गोपाळ गुरखुदे, सुनील गोपीशेट्टी, सरफराज मोमीन, अतीक कुरेशी, अक्षय नरवडे, पठाण शाहरुख यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



लोकनेते स्व.गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंती निमित्त स्वामी रामानंद तीर्थ शासकीय रुग्णालय अंबाजोगाई येथे केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार मा.सौ.नमिताताई अक्षय मुंदडा यांच्या वतीने दि.१२/१२/२०२३ रोजी मुलीला जन्म दिलेल्या माताचा साडीचोळी आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला त्याप्रसंगी स्वा.रा.ती.रुग्णालयाचे डॉ.श्री.गणेश तोंडगे सर, डॉ.किरण डवळे,डॉ.प्रतिमा महाबळे,डॉ.नव्यश्री,डॉ.वर्षा सोनवणे, डॉ.अमारा मिर्झा,डॉ.नेहा परुळेकर ,नर्स,कर्मचारी तसेच वसुंधरा सेवा प्रतिष्ठानचे श्री.महादू मस्के साहेब व इतर सदस्य उपस्थित होते.

# एकता मराठी साहित्य संमेलनाच्या पुर्वतयारीनिमित्त गोमळवाडा येथे बैठक संपन्न

शिरूरकासार (प्रशांत बाफना) : येत्या २१ आणि २२ डिसेंबर रोजी तालुक्यातील गोमळवाडा येथे संपन्न होणाऱ्या एकता मराठी साहित्य संमेलनाच्या पुर्वतयारीनिमित्तची बैठक श्रीराम संस्थानच्या सभागृहात महंत भानुदास महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. यावेळी संमेलनाचे नियोजित स्वागताध्यक्ष आजिनाथ गवळी, ज्येष्ठ साहित्यिक अनंत कराड, पत्रकार गोकुळ पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. दोन दिवसीय साहित्य संमेलनाच्या अनुषंगाने स्वागत समिती, ग्रंथदिंडी समिती, देखरेख समिती, भोजन, पार्किंग, सत्कार, स्वच्छता आणि प्रसिद्धी समितीसह वेगवेगळ्या समित्या गठीत करून त्यांचे नियोजन करण्यात आले. याप्रसंगी आजीनाथ गवळी यांनी मी जरी स्वागताध्यक्ष असलो तरी हा कार्यक्रम गोमळवाडा ग्रामस्थ आणि परिसरातील नागरिकांच्या सहकार्याने आपल्याला यशस्वी करायचा असल्याचे सांगितले. सर्वांनी तन मन धनाने संमेलनासाठी आपले योगदान द्यायचे असून सर्वांच्या पुढाकाराने हे संमेलन यशस्वीपणे पार पडणार असल्याचा विश्वास त्यांनी बोलून दाखविला. महंत भानुदास शास्त्री यांनी 'एकल्याचा नोहे हा खेळ' या अभंगाचा संदर्भ देत संमेलनाच्या यशस्वितेसाठी सर्वांनी आपापल्यापरीने योगदान द्यायचे असून ज्या प्रमाणे आपण सप्ताहाचे नियोजन करतो त्याप्रमाणेच हे नियोजन करायचे असल्याचे सांगितले. शिवाय दोन दिवशीय संमेलनात असणाऱ्या सर्व कार्यक्रमात सक्रियपणे सहभागी होऊन सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन देखील त्यांनी केले. या बैठकीला एकता फाऊंडेशनचे कोषाध्यक्ष शिवलिंग परळकर, उपाध्यक्ष माही शेख, संस्थापक सदस्य लखुळ मुळे, बबनराव सुरे, विनोद काकडे, समीर पठाण, महादेव कातखडे, प्रशांत गंभीरे, दत्तु सुरे, प्रभाकर पवार, शिवाजी शिंदे, हरी साळवे, बाबासाहेब काकडे, दगडू टाक, चांगदेव सुरे, दादाहारी काकडे, बापूराव साळुंके, रामनाथ जेधे, महादेव पवार, गणेश पवार, जालिंदर तावरे, अभिमन्यू कातखडे, बहादुर्गे सर, हरी काकडे, सुदाम पवार सर ,कचरू नेटके, बबन काकडे, भास्कर काकडे, श्रीमंत गर्जे, संदीपान कातखडे, बिभिषण काकडे, अभिमान पवार, हनुमंत बनकर, नवनाथ मैंदड, विठ्ठल बारगजे, साईनाथ पालवे, अक्षय मोरे, अक्षय गायकवाड, अंकुश गवळी, नितीन काकडे, सावता कातखडे, सौ.वैशाली गवळी, वंदना काकडे, दैवशाला सुरे, प्रतिक्षा गवळी, स्वाती पवार, योगीता गवळी, भारती खेत्रे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

चोखमेळा सामुदायिक शेती संस्थेचे सभासदांना ७/१२ देण्याचे आदेश निर्गमित करण्यासाठी

# लोकआयुक्त कडे -अविनाश जगतकराची तक्रार

परळी वै. (प्रतिनिधी )परळी येथील गट नं.४३९,४४० मधील चोखमेळा सामुदायिक शेती संस्था. मर्या. परळी चे सभासद संस्था अवसयनात निघाल्या पासून वैयक्तिक ७/१२ मिळावा या साठी तातकालीन निवासी उपजिल्हाधकारी. बी. एम. कांबळे बीड यांनी दि.२५ मार्च २०११ रोजी सविस्तर प्रस्ताव विभागीय आयुक्तताना वरील संस्थेस सातबारा देण्यासाठी सादर केला असता त्यानंतर विभागीआयुक्तनी दि.२८-४-२०११रोजी ऐकून १० त्रुटीचे पत्र जिल्हाधकारी बीड यांना पाठवले त्या पत्राअन्वयं त्यानी तहसीलदार परळी यांना दि.१७-६-२०११ त्रुटी अहवाल सादर करण्याचे आदेशीत केले, सर्व त्रुटीचीं पूर्तता अहवाल तहसील कार्यलय, परळी वै. यांनी दि.२ जानेवारी २०१२ रोजी जिल्हाधिकारी यांना सादर केला, तो अहवाल तात्कालीन जिल्हाअधिकारी श्री. सुनील केंद्रेकर यांनी विभागीय आयुक्त यांना पाठवला तेव्हा विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी त्याचे पत्र दि.५-३-२०१३ अन्वय जिल्हाअधीकारी श्री. केंद्रेकर यांना कळवले की प्रस्ताव १२ जुलै २०११ च्या शासननिर्णय प्रमाणे तपासून सादर करा परंतु जिल्हाअधीकारी श्री केंदरेकरांनी जातीयवादी दरष्टीकोन ठेऊन सदर शासननिर्णय हा फक्त अतिक्रमित गायरान जमिनीसाठी असताना, कोणतेही विधिवत माहिती न घेता व सहकार विभागाचे सामुदायिक शेती संस्थाचे सभासद यांना वैयक्तिक ७/१२देणे चे शासनिर्णय दि.२० सप्टेंबर १९७३, व दि.९ जानेवारी १९७३ चे असताना देखील बेकायदेशीर शासन निर्णय १२ जुलै २०११ हा अतिक्रमित जमिनीतील अतिक्रमण धारकांसाठिचा असताना त्या शास्तनिर्णया अन्वय संस्थेचीं जमीन परत घ्यावी असे अहवालात नमूद करून विभागीय आयुक्तना दि.१६ सप्टेंबर २०१३ च्या पत्रानवय अहवाल सादर करून, वास्तविक संस्था चे नावे ७/१२असता व मूळ सभासदा चे नावे फेरफार असताना सुद्धा वरील सहकारविभागाणे १९७३ च्या वरील शासनिर्णयत स्पस्ट उल्लेख आहे की ड वर्ग प्राप्त शेती संस्था सभासद किंवा त्यानंचे वारसानचे नावे वयक्तिक ७/१२ करणे साठी जिल्हाधिकारी यांना अधिकार आहेत परंतु तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी कायदाचे विडंबन करून अहवालात नमूद करून मावसवर्गीय लोकांना न्यापासून वनचित केले म्हणून या अन्याय विरोधात महाराट्र राज्य चे लोकांयुक्त कडे दि.२९-११-२०२३ रोजी वरील साभासदाना न्याय मिळण्यासाठी अविनाश जगतकर (पत्रकार )यांनी निवेदन सर्व मूळ (लीगल) कागदपत्रे अनवे दिले आहे.





# मातंग समाजातील नेत्यांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली समाजाचा मोर्चा धडकला- आनद सुतार

सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनावर मातंग समाजाचा थडक मोर्चा निघाला व या मोर्चा संदर्भात राज्याची उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांना मातंग समाजाची शिष्टमंडळ भेट घेतली व त्यांनी अनुसूचित जाती या प्रवर्गामध्ये अ ब क ड प्रमाणे वर्गवारी करावी अशी निवेदनाद्वारे मागणी केली.

सविस्तर माहिती अशी की हिवाळी अधिवेशनावर मातंग समाजाचा हजारोच्या संख्येने पोहोचलेला मोर्चा व त्यांनी माजी उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांना अनुसूचित जाती प्रवर्गात अ ब क ड प्रमाणे वर्गवारी करून अनुसूचित जातीमध्ये जे जाती ज्यांना जेवढा आरक्षणाचा फायदा मिळाला पाहिजे होता तेवढा मिळाला नसल्यामुळे सर्वांना समान आरक्षण वर्गवारी करून सर्व जातींना समान न्याय मिळेल यासाठी मागणीचे निवेदन दिले व यावेळी उपमुख्यमंत्री फडणवीस साहेब यांनी शिष्टमंडळास आश्वासन दिले की लवकरच याच्यासाठी अभ्यास आयोग तयार करून सर्व माहिती गोळा करून त्याविषयी सखोल अभ्यास केली जाईल. असे आश्वासन मातंग समाजाच्या शिष्टमंडळात दिले व या शिष्टमंडळाचे नेतृत्व डॉ. अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष अमितजी गोरखे साहेब यांनी केले व यावेळी सर्व पदाधिकारी उपस्थित होते.आज नागपूरअधिवेशनामध्ये माननीय उपमुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस यांना निवेदन देऊन सविस्तर चर्चा करण्यात आली, त्यावेळी अण्णाभाऊ साठे महामंडळाचे माजी अध्यक्ष अमित गोरखे,डॉ गणपत भिसे, श्री रणजीत कांबळे, प्रा पंडित सूर्यवंशी, श्री राजाभाई सूर्यवंशी, श्री भास्कर नेटके उपस्थित होते.

शिष्टमंडळाची संपूर्ण बाजू माननीय उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी व्यवस्थित ऐकून घेउन , लवकरात लवकर उच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्तीनच्या अध्यक्षतेखाली अभ्यास आयोगाची स्थापना करण्यासाठी आश्वस्त केले आहे.




अंबाजोगाई शहरातील श्रीनिवास घनघाव याची आंतरराष्ट्रीय दिव्यांग क्रिकेट संघामद्ये निवड झाल्याबद्दल सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देताना आदरणीय नंदकिशोरजी मुंदडा (काकाजी) मा.नगराध्यक्ष महादूजी मस्के व इतर मान्यवर

# पीएम किसान व नमो किसान महासन्मान योजनेतून एकही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही - धनंजय मुंडे

नागपूर - केंद्र सरकारच्या पीएम किसान व राज्य सरकारच्या नमो किसान महासन्मान योजनेतुन राज्यातील एकही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही, यादृष्टीने कृषी विभाग कृतिशील असल्याची माहिती आज कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात बोलताना दिली.



पीएम किसान योजनेसाठी राज्यातून सुमारे ९६ लाख शेतकरी पात्र ठरले होते. राज्य सरकारने नमो किसान महासन्मान योजना घोषित केल्यानंतर केंद्राच्या नियमानुसारच या योजनेची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली होती. मात्र ई केवायसी पूर्ण नसणे, बँक खाते आधार शी संलग्न करणे, अशा काही अटींची पूर्तता न होऊ शकल्याने यांपैकी १२ ते १३ लाख शेतकरी लाभापासून वंचित राहिले होते.

पीएम किसान योजनेच्या चौदाव्या हफत्याच्या वितरणानंतर ही बाब लक्षात आल्याने, कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या संकल्पनेतून कृषी, महसूल व भूमिअभिलेख आदी विभागांच्या समन्वयातून एक विशेष मोहीम राबवत आतापर्यंत सुमारे ६ लाख शेतकऱ्यांच्या वरील अटींची पूर्तता करण्यात अली आहे.

त्याचप्रमाणे जे शेतकरी अल्प भूधारक किंवा अन्य कारणांनी लाभार्थी ठरत नाहीत, त्यांचे नाव योजनेतून कमी करण्याची देखील कार्यवाही केली जात आहे. मात्र या कार्यवाहीचा परिणाम एकाही पात्र लाभार्थ्यावर होऊ देणार नाही, अशी खात्री धनंजय मुंडे यांनी उपस्थित प्रश्नाच्या निमित्ताने दिली. या विषयावर आ.नानभाऊ पटोले, आ.बाळासाहेब थोरात आदी सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला होता.




नवनियुक्त उप विभागीय अधिकारी तथा नगरपालिका प्रशासक मा. करिष्मा नायर मॅडम यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नगर सेवक मुखिद लाला, प्रवीण सुरवसे ,व मी प्रमोद वंजारे



गेली १३ वर्ष झाली संत चक्रवर्ती ज्ञानोबारायांच्या समाधी सोहळ्यानिमित्त श्रीक्षेत्र आळंदीत येथील अद्भुत अशा सिद्धबेटावर पं. कल्याणजी गायकवाड संगीत प्रतिष्ठानच्या वतीने भव्य प्रमाणात दीपोत्सव साजरा करण्यात येतो तसेच प्रतिष्ठानच्या वतीने तळागाळात कार्यरत असणा-या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणा-या व्यक्तींचा सन्मान या पवित्र भूमीत करण्यात येतो. संत ज्ञानोबारायांच्या ७२७ व्या समाधी सोहळ्यानिमित्त आज रोजी दीपोत्सव करण्यात आला. या कार्यक्रमात पं कल्याणजी गायकवाड, गायिका कार्तिकी गायकवाड, कौस्तुभ गायकवाड यांच्या शुभहस्ते पत्रकार सुनिल ज्ञानदेव भोसले, पुणे यांना पं कल्याणजी गायकवाड सामाजिक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी मठाधिपती अमृतानंद जोशी, प्रतिष्ठानचे अध्यक्ष संदीप राक्षे, सुनितामाई गायकवाड, भजन सम्राट आदिनाथ सटले, भजन सम्राट तुळशीराम आतकरे, ह.भ.प पांडुरंग महाराज कदम, ह.भ.प संजय महाराज कावळे, प्रल्हाद महाराज टकले, कैवल्य महाराज गायकवाड, प्रसिद्ध तबलावादक महादेवराव सगळे, माऊली महाराज, अमोल नवपुते, मृदंगमणी रघुराज ढोबळे, किशोर राक्षे, रोहीत बोरूडे, नितीन भागवत, मारूती तायनाथ, संतोषराव साळुंके, गौरव राक्षे, संतोष कदम हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन संकेत संदीप राक्षे यांनी केले होते..

# बीड बसस्थानका समोर अँपे रिक्षा व अस्ताव्यस्त पार्किंगमुळे वाहतूक कोंडी

## वाहतूक पोलीस कर्मचाऱ्याचे अर्थपूर्ण दुर्लक्ष व बघ्याची भूमिका

**बीड (प्रतिनिधी)बीड दिनांक ०४ एप्रिल सध्या बीड शहरात उन्हाचा पार वाढत असून,वाहतूक कोंडीमुळे नागरिक अधिकच परेशान झाले आहेत.बीड बस स्थानका समोर विनापरवाना अँपे रिक्षा मुळे बस स्थानका समोर सतत वाहतुक कोंडी पाहायला मिळते.हें रिक्षा चालक आडवी,उभी वाहने लावतात.दोनशे मीटर च्या मध्ये कोणतेही खाजगी वाहन लावण्यास किंवा प्रवाशी वाहतूक करण्यास मनाई आहे असा आदेश न्यायालयाचा असताना देखील फक्त पोलीसाच्या अर्थपूर्ण दुर्लक्षने आदेशाची अंमलबजावणी होत नाही असे दिसून येत आहे.**

बस स्थानका समोरच रिक्षा, अवैध वाहतूक करणारे वाहने लावली जातात व पोलीसा समोर ह्या वाहनात प्रवाशी भरतात पण पोलीस अर्थपूर्ण दुर्लक्ष करतात.मंडी रोडवर दवाखाना असल्याने उपचारासाठी रुग्ण येत असतात पण त्याना देखील या वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. शहरातील साठे चौक,मंडी कॉर्नर,माळ वेस,शिवराज चौक,बशीर गंज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतुळ्याच्या बाजूला,सुभाष रोड,बार्शी नाका तसेच सर्वच चौकात अवैध रिक्षा,वाहतुकीमुळे कोंडी होत आहे.

बीड बस स्थानका समोरच दुचाकी,गाड्या व बँकेत जाणाऱ्या ग्राहकाच्या दुचाकी मुळे सतत वाहतूक कोंडी होत आहे.रिक्षा चालक बस स्थानकच्या गेट समोरच वाहन उभे करून प्रवाशी भरतात,हिच परिस्थिती बस स्थानकाच्या मागली बाजूला पाहावयास मिळते. वाहतूक पोलीस कर्मचारी फक्त बघ्याची भूमीका घेतात.सध्या परीक्षा चालू असल्यामुळे व रमजान महिना उपवास असल्याने सायंकाळच्या वेळी खूप गर्दी असते त्यामुळे विध्यार्थी व नागरिकांना यांचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे.सुभाष रोड ते मंडी मध्ये जाणाऱ्या रस्त्यावर अर्धा अर्धा तास वाहतूक कोडी असते.या महिन्यात विविध सणांना सुरुवात होत आहे तसेच महापुरूषाच्या याचा महिन्यात जयंती आहे, मुस्लिम नागरिकांनसाठी स्वस्त दरात खरेदी करता यावी म्हणून बशीर गंज मध्ये मीना बाजार भरवला जातो त्याना पण वाहतुक कोंडी सामना करावा लागत असल्याने बशीर गंज मध्ये पोलीस कर्मचारी नियुक्त करावी.शहरात नागरिकांची खरेदी करण्यासाठी रेलचेल वाढत आहे.रात्री खाजगी वाहतूक करणारे ट्रॅव्हल्सवाले बस स्थानका समोरच मुंबई, पुणे जाणारे प्रवाशी भरत असल्यामुळे आणखीनच वाहतूक कोंडी होते त्याना एक शहारा बाहेर ट्रॅव्हल्स भरावे असा आदेश पोलीस अधीक्षक यांनी पोलीस शहर व वाहतूक पोलीस निरीक्षक यांना देऊन दुसऱ्या ठिकाणी वाहन भरण्यासाठी सक्ती करावी.

वाहतूक निरीक्षकानी पोलीस चोकी सोडून शहरातील मुख्य रस्त्यावर, चौकात फिरून वाहतुकी बाबद समास्या सोडवल्या पाहिजे तरच वाहतूक कोंडी पासून नागरिकांना दिलासा मिळेल.बीड शहरातील(साठे चौक सागर हॉटेल,सुभाष रोड,शिवराज चौक,डॉ.आंबेडकर पुतळा,बशीर गंज,बार्शी नाका चौक,तेलंगाव नाका,माळवेस चौक,धोंडीपुरा,बशीर गंज चौक)या प्रत्येक चौकात ऐक वाहतूक पोलीस कर्मचाऱ्याची नेमणूक करून विध्यार्थी,नागरिकांना व शहरात उपचारासाठी येणाऱ्याना होणाऱ्या वाहतूक कोंडीच्या त्रासापासून मुक्त करावे अशी मागणी नागरिकांतुन होत आहे....

**मीना बाजारास काही दिवसात सुरुवात होणार बशीर गंज चौकात पोलीस कर्मचारी नेमणूक करावी**

**बीड शहरातील मुख्य रस्त्यावर तसेच चौका-चौकात वाहतूक कोंडी**

**न्यायालयाचा दोनशे मीटरच्या आता खाजगी वाहतूक करण्यास मनाई आदेश पाळला जात नाही**

# बीड च्या आर.टी.ओ कार्यालयात वाहन धारकाची आर्थिक लूट !

## लक्ष्मी दर्शनाशिवाय कर्मचारी व अधिकारी कामच करत नाहीत

## जिल्हाधिकारी मॅडम खाजगी एजेंट ला कार्यालयीन बंदी घालाच वाहनांची कागदपत्रे काही एजेंटच्या घरी

बीड(प्रतिनिधी)बीड

बीड चे आरटीओ कार्यालय नेहमीच वेगवेगळ्या कारणाने चर्चेत असते,यापूर्वी वाहनांची बनावट कागदपत्रे तयार करून ती वाहने विक्री केली होती त्यामुळे बीड आर.टी.ओ.कार्यालयची बदनामी व चर्चा राज्यभर झालेली आहे.या कार्यालयात वाहन परवाना नूतनीकरण साठी येणाऱ्या नागरिकांना (बि फोर मि)उशीर झाल्यास शंभर रुपये फाईन दिला जातो.पण त्याची पावती दिली जात नाही.

तसेच वाहन पासिंग,फिटनेस,नूतनीकरणजी फॉम च्या नावाखाली वेगवेगळ्या पद्धतीने त्रास देत एजेंट मार्फत हजारोची मागणी केली जाते.वाहन फिटनेससाठी वाहन धारक आपले वाहन पासिंगसाठी शहारा बाहेर तळेगाव जवळ ट्रॅक बनवण्यात आला आहे. वाहन निरीक्षक स्वतः वाहन चालवत तपासणी करतात खरे परंतु यामध्ये,प्रामुख्याने वाहनाची एखादी लाईट बंद असणे,हॅन्ड ब्रेक काम करत नसेल,रेडियम कमी असेल,रेडियम सर्टफिकीट नसणे,मालवाहू वाहनावर कॅरिअर असेल,रिव्हस लाईट बंद असणे,इंडिकेटर बंद, वायपर बंद,काचेवर रेडियम चे नाव असणे,यासह वाहनाचा ट्रायल घेताना वाहन एका बाजूला जात असेल तर हें ऍडजेस्ट करण्यासाठी ही एका खुटी ला एक हजार प्रमाणे जेवढ्या खुट्या निरीक्षक लिहतात त्या प्रमाणे प्रत्येकी एक हजाराची एजेंटकडे पैशाची मागणी केली जाते.एका खुटी साठी एक हजार रुपये यामुळे बीड आर.टीओ.कार्याल आहे की लुटारूंचा अड्डा असाच प्रश्न वाहन धारकाला पडत आहे. यात पासिंगसाठी जाणाऱ्या प्रत्येक वाहन धारकाच्या खिशाला खात्री बसत आहे.दररोज वीस वाहन तपासले जातात,एक इन्स्पेक्टर फक्त एक महिन्यासाठी ट्रॅक वर असतो त्यामुळे त्याना एका महिन्यात पैसे कमावण्याची संधी मिळते त्याचच ते अधिकारी संधी च सोन करतात.जो वाहन धारक पैसे देतो त्याचे काम आठवड्याच्या आत पासिंग व फिटनेस सर्टफिकीट दिले जाते.जो पैसे देत नाही त्याचे कामे लटकवली जात आहेत, एजंटामार्फत पैसे पुरवल्यास त्यांची कामे तात्काळ होतात मात्र नियमाकडे बोट दाखवणाऱ्यांना मात्र त्रास दिला जात असल्याचे चित्र बीड येथील आरटीओ कार्यालयात दिसत आहे.

आरटीओ कार्यातून फिटनेस सर्टिफिकेट व वाहन तपासणी लर्निंग लायसन्स,वाहन ट्रान्सफर, यासह वेगवेगळ्या कामांसाठी पैशाची मागणी सर्रासपणे होते यामध्ये वाहनचालकांना कर्मचारी अधिकाऱ्यांच्या त्रासाला सामोरे जाल जावे लागत असून एजंटही पैशाची वसुली करत आहेत बीडचे आरटीओ कार्यालय लुटारुंचा अड्डा बनला आहे, एक आरटीओ ची बदली झाली असेल तर त्या जागी दुसरा अधिकारी येतो त्यांना पाहिला अधिकारि आपल्या खाजगी नेमलेल्या एजेंट ची शिफारस करतो की त्याला कलेक्ससाठी ठेवा.माझ्या विश्वासतला आहे त्यामुळे एजेंट ला कार्यालयात येऊ दिले नाही पाहिजे.काही खाजगी एजेंट च्या बॅग मध्ये,चारचाकी वाहनात तर आर.टी.ओ.ऑफिस मधील कागदपत्रे असतात,त्यानंच्या कडे ही शासकीय कागदपत्रे देण्याचा अधिकार कोणी दिला,काही कागदपत्रे वाहन निरीक्षक च्या रूमवर असतात याकडे बीड जिल्हाधिकारी यांनी लक्ष देणे आवश्यक आहे व जो कर्मचारी,अधिकारी दोषी असेल त्याला तात्काळ निलंबन करावे तरच ईतर लाचखोराना जरब बसेल.

## मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शपथ घेताच लागले कामाला

## धार्मिक स्थळांवर लाऊड स्पीकरवर बंदी

भोपाळ /वृत्तसंस्था

मध्य प्रदेशात लाऊडस्पीकरवर बंदी घालण्यात आली आहे. मुख्यमंत्रीपदाची शपथ घेताच मोहन यादव यांनी हा मोठा निर्णय घेतला आहे. त्यांनी मुख्यमंत्री बनल्यानंतर पहिला आदेश जारी केला आणि लाऊडस्पीकरवर बंदी घातली. या आदेशानुसार धार्मिक आणि सार्वजनिक स्थळांवर लाऊडस्पीकरवर बंदी घालण्यात आली आहे. या आदेशासाठी सुप्रीम कोर्टाचे गाईडलाईनचा हवाला देण्यात आले आहे.



**मुख्यमंत्र्यांनी हाती घेतला पदभार**

मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांनी बुधवारी मंत्रालय स्थित मुख्यमंत्री कक्षात पूजा-अर्चना करत कार्यभार हाती घेतला. कार्यभार हाती घेताच त्यांनी पहिला आदेश दिला आहे. या आदेशांतर्गत राज्यात लाऊडस्पीकरवर बंदी घालण्यात आली आहे.

**आदेशाच्या प्रतीही आल्या समोर**

शासनाकडून जारी करण्यात आलेल्या आदेशाच्या प्रतीही समोर आल्या आहेत. यात लिहिले आहे की विविध धार्मिक स्थळांवर निर्धारित डेसिबलचे उल्लंघन करताना लाऊडस्पीकरचा वापर केला जात आहे. आवाजामुळे मनुष्याची काम करण्याती क्षमता, आराम तसेच झोपेत व्यत्यय येतो. जोरजोरात आवाज असलेल्या वातावरणामुळे हाय बीपी, अस्वस्थता, मानसिक तणाव, अनिद्रासारखे त्रास होतात.

# राज्यात २३ हजार ६२८ पदांची पोलीस भरती होणार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधान परिषदेत माहिती

नागपूर (प्रतिनिधी)

गृह विभागातील १९७६ पासून आकृतीबंध नुसार पदभरती केली जात होती. आता लोकसंख्यनुसार किती अंतरावर पोलिस स्टेशन, कर्मचारी, युनिट असले पाहिजे याबाबत नवीन आकृतीबंध तयार करण्यात आला असून याअंतर्गत २३ हजार ६२८ पोलिस शिपाई पदे भरली जाणार असल्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत सांगितले.

गृह विभागातील पोलीस शिपाई भरती तातडीने करण्याबाबत लक्षवेधी सूचना सतेज उर्फ बंटी पाटील यांनी मांडली होती. यावर उत्तर देताना उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. नवीन आकृतीबंधानुसार मोठ्या प्रमाणात पोलीस भरती करण्यात येणार आहे. यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. ८ हजार ४०० लोकांना प्रशिक्षण देण्याची क्षमता होती, ती वाढवण्यात आली आहे. कोरोना काळात अनेक उमेदवारांची वयोमर्यादा संपत आल्याने उमेदवार निराश झाले होते. यासंदर्भात गृह विभागाशी चर्चा करून निर्णय घेऊ, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.




पोलीस शिपायाची परीक्षा एजन्सीकडे दिली असून यात अनुचित प्रकार होऊ नये म्हणून जॅमर बसवण्याचा प्रायोगिक तत्त्वावर वापर करण्यात येणार आहे. यासाठी सायबर प्लॅटफॉर्म तयार करण्यात येत असून यामध्ये सोशल मीडिया साईट,गेम सॉफ्टवेअरचा अंतर्भाव केला जाणार आहे. सायबर गुन्ह्याचे प्रमाण कमी करण्यासाठी ठोस पावले उचलण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT